पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
9601222777
9615222777
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १९५। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | गुरूवार १३/०८/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# आश्वी परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ

## एकाच रात्रीत फोडली तीन घरे, नागरीकांमध्ये भिती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील आश्वी परिसरात चोरट्यांनी पुन्हा एकदा दहशत निर्माण केली आहे. निमगावजाळी शिवारातील गोरक्षवाडी येथे पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी एकापाठोपाठ तीन घरे फोडून सुमारे १ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. या धाडसी चोरीच्या घटनेने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे तीन वाजेच्या सुमारास ग्रामस्थ गाढ झोपेत असताना चोरट्यांनी अमोल मच्छिंद्र अरगडे यांच्या घराला लक्ष्य केले. अरगडे कुटुंब घराच्या पुढील भागात झोपलेले असताना चोरट्यांनी मागील दरवाजा उघडून घरात प्रवेश केला. घरातील लोखंडी पेट्या आणि कपाटे जवळील शेतात नेऊन त्यांनी उचकापाचक केली. यात कोथिंबीर विकून आलेले १ लाख रुपये व घरातील अन्य १० हजार अशी एकूण १ लाख १० हजार रुपयांची रोकड आणि सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले.

यानंतर चोरट्यांनी संदेश बाळासाहेब चोपडे यांच्या घराचे कुलूप तोडले. मात्र चोपडे कुटुंब संगमनेर येथे वास्तव्यास असल्याने त्यांच्या घरात मौल्यवान ऐवज नव्हता. त्यामुळे चोरट्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. त्यानंतर योगेश विलास वदक यांच्या घरातील सामानही बाहेर शेतात नेऊन उचकापाचक करत चोरट्यांनी १ हजार ५०० रुपयांची रोकड लांबवली. सकाळी अमोल अरगडे कुटुंबीय उठल्यानंतर घराचा मागील दरवाजा उघडा आणि शेतात पेट्या फोडलेल्या अवस्थेत आढळल्याने चोरीचा प्रकार उघडकीस आला.

घटनेची माहिती मिळताच आश्वी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट पथकासह दाखल झाले. चोरट्यांचा माग काढण्यासाठी अहमदनगर येथून श्वानपथक व ठसेतज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर अमोल अरगडे यांच्या फिर्यादीवरून आश्वी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ), ३३१ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाच ऑगस्ट रोजी आश्वी बुद्रुक येथे एका ज्येष्ठ महिलेचे दागिने लुटण्याची घटना घडली होती. तसेच दोन महिन्यांपूर्वी आश्वी, उंबरी, चिंचपूर परिसरातही चोरट्यांनी धुमाकूळ घातला होता. आता पुन्हा चोरीच्या घटनांची मालिका सुरू झाल्याने चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढला

## पालिकेची फवारणी यंत्रणा ठप्प

### तक्रारींच्या संदेशांपुरतीच कारवाई?

**नागरिकांच्या समस्या तातडीने प्रशासनापर्यंत पोहोचाव्यात यासाठी नगरपालिकेने सुरू केलेल्या ॲपवरही नागरिक तक्रारी नोंदवत आहेत. मात्र तक्रार केल्यानंतर 'तुमची तक्रार स्वीकारण्यात आली आहे', 'लवकरच कार्यवाही करण्यात येईल' तसेच 'तक्रारीवर कार्यवाही करण्यात आली आहे', असे संदेश प्राप्त होतात. प्रत्यक्षात मात्र संबंधित ठिकाणी पाहणी अथवा ठोस उपाययोजना झाल्याचे दिसून येत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे ॲपवरील तक्रार निवारण यंत्रणा केवळ संदेश पाठविण्यापुरतीच मर्यादित आहे का असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.**



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पावसाळा सुरू झाल्यानंतर संगमनेर शहरातील विविध भागांत रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असून, या साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढली आहे. त्यातच अनेक ठिकाणी अस्वच्छता, दुर्गंधी तसेच मोकाट जनावरे, कुत्रे व डुकरांचा वावर वाढल्याने शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. डासांचा वाढता प्रादुर्भाव आणि अस्वच्छ वातावरणामुळे साथीचे आजार पसरण्याची भीती निर्माण झाली असून, अनेक नागरिक विविध आजारांनी त्रस्त असल्याचे चित्र आहे.

पावसाळ्यात शहरातील रस्त्यांवरील खड्डे नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असतानाच या खड्ड्यांमध्ये साचलेले पाणी डासांच्या उत्पत्तीचे केंद्र बनले आहे. अनेक दिवस पाणी साचून राहत असल्याने परिसरात दुर्गंधी निर्माण होत असून नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. काही भागांत कचरा आणि साचलेल्या पाण्यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे.

विशेष म्हणजे, नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी असलेल्या नगरपालिका प्रशासनाकडे डास प्रतिबंधक औषध फवारणीची यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत

(पान ४ )

# संसदेत गोंधळासह आरोप-प्रत्यारोप कायम



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

आम्हाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं कोणतंही भाषण किंवा लेक्चर्स ऐकण्यात अजिबात रस नाही. जंतरमंतरवर आंदोलक विद्यार्थ्यांवर पॅलेट गनने गोळ्या झाडण्याचे आणि लाठीचार्जचे आदेश नेमके कुणी दिले, हे त्यांनी आधी स्पष्ट करावं, अशा शब्दांत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गृहमंत्र्यांवर थेट निशाणा साधला आहे.हे आदेश गृहमंत्रालयाने दिले असतील तर अमित शाह दोषी आहेत, आणि जर आदेश दिले नसतील तर ते अकार्यक्षम आहेत; त्यामुळे दोन्ही परिस्थितींत त्यांनी तात्काळ गृहमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी तीव्र मागणी राहुल गांधी यांनी संसदेच्या आवारात केली. संसदेत जंतरमंतर घटनेवर केंद्रीय गृहमंत्री आपली बाजू मांडणार असल्याच्या पार्श्वभूमीवर, राहुल गांधी यांनी संसद भवनाच्या परिसरात माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. या वेळी बोलताना त्यांनी सरकारवर आणि गृहखात्यावर प्रश्नांची सरबत्ती केली.

राहुल गांधी म्हणाले, मी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी कालच याबाबत पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. दिल्ली पोलिसांवर आणि गृहमंत्रालयावर कुणाचे नियंत्रण आहे? सिस्टिमने या निष्पाप तरुणांवर आणि विद्यार्थ्यांवर गोळीबार करण्याचे आदेश दिले होते का? या प्रश्नांची उत्तरे गृहमंत्र्यांनी दिली पाहिजेत. (पान ३ वर)

# दूध-पनीरसह अन्न भेसळखोरांवर मकोकाची टांगती तलवार

## कायदेशीर प्रक्रिया भक्कम करण्यासाठी लीगल टीम




मुंबई (वृत्तसंस्था)

दूध, पनीर आणि इतर अन्नपदार्थांमध्ये भेसळ करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोर माफियांना आता चाप बसण्याची शक्यता आहे. अशा भेसळखोरांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाला दिल्या आहेत.

सह्याद्री अतिथीगृह येथे 'विकसित महाराष्ट्र २०४७' अंतर्गत सन २०२६-२७ या वर्षासाठी विभागाला निश्चित करण्यात आलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेबाबत झालेल्या बैठकीत शिंदे बोलत होते. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सादरीकरणादरम्यान त्यांनी भेसळखोरांविरोधात कठोर भूमिका घेण्याचे निर्देश दिले.

अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणे हा केवळ साधा गुन्हा नसून तो थेट नागरिकांच्या जीवाशी खेळ असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. विशेषतः लहान मुले मोठ्या प्रमाणावर दूध सेवन करतात. बनावट पनीर, भेसळयुक्त दूध आणि अन्य अन्नपदार्थांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे अशा प्रकारे नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या समाजकंटकांवर कोणतीही नरमाई न दाखवता कठोर कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

भेसळखोरांविरोधात अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात यावी, जेणेकरून कायदेशीर पळवाटा शोधण्यास वाव मिळणार नाही, अशी सूचनाही शिंदे यांनी केली. कारवाईनंतर न्यायालयीन प्रक्रियेत कोणतीही कायदेशीर त्रुटी राहू नये, यासाठी ज्येष्ठ विधीतज्ज्ञांची मदत घेण्यात यावी, (पान ४)

ADVANCE GOLD -SIP- SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% ते 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
श्रावण मास आणि रक्षाबंधन निमित्त
चांदी खरेदी वर 30% डिस्काउंट
ऑफर फक्त 31 ऑगस्ट पर्यंत
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# घाटकोपरमध्ये दरड कोसळून ६ जणांचा मृत्यू, अनेकजण अडकले



मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबईच्या घाटकोपरमधील अशोक नगर येथील गौसिया चाळ परिसरात डोंगराचा भाग कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेनंतर अद्याप युद्धपातळीवर बचाव कार्य सुरु असून यात मृतांची आकडा वाढला आहे. मिळालेल्या माहितीनुसार आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. पहाटे साडे तीन ते चारच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली होती. यात दोन ते तीन घरांवर दरड कोसळली असून यामध्ये अनेक जण अडकल्याची प्राथमिक माहिती आहे. अशातच सहा ते सात तासांच्या अथक परिश्रमानंतर ६ जणांचे मृतदेह हाती लागले असून, अजूनही काही जण या ढिगाऱ्याखाली अडकून असल्याची माहिती आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, एनडीआरएफ आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, अडकलेल्या नागरिकांच्या बचावासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे. यासाठी पहाटेपासून बचावकार्य सुरु असताना यात अल्ट्रा सेन्सर मशीनने मलब्या खाली अडकलेल्यांना शोधले जात आहे. तर ड्रोनची देखील मदत यात घेण्यात आली आहे.दरम्यान, साकीनाका येथील दुर्घटनेत मृतांचा कुटुंबातील लोकांना पालिकेकडून ३ लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. तर दुर्घटना घडलेल्या ठिकाणी रहात असलेल्या लोकांचे सुरक्षितस्थळी पुर्नवसन केलं जाईल. अशी देखील माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे. तर या पूर्वीच तिथे राहणाऱ्या लोकांना तो परिसर धोकादायक असल्याने नोटीसा बजावल्या होत्या. असे देखील सांगण्यात आलं आहे. तर यावर बोलताना महापौर रितू तावडे यांनी सांगितले की, 'साकीनाका येथील घटना अंत्यत दुर्दैवी आहे. या दुर्घटनेत मृत पावलेल्यांच्या कुटुंबियांना ३ लाखांची मदत जाहिर केलेली आहे.

# १० हजार कोटींची देणी थकीत; कंत्राटदारांचा आंदोलनाचा इशारा

## शासनाला पंधरा ऑगस्टपर्यंत अल्टिमेटम

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - महाराष्ट्रातील आदिवासीबहुल भागांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राबविण्यात आलेल्या विकासकामांची तब्बल १० हजार कोटी रुपयांची देणी प्रलंबित आहेत. या प्रश्नावर मंगळवारी (दि. ११) मुंबईत राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांच्यासोबत झालेली बैठक निष्फळ ठरल्याची माहिती अहिल्यानगरचे कंत्राटदार प्रतिनिधी बाजीराव दराडे यांनी दिली. शासनाने तातडीने निधी उपलब्ध न केल्यास १८ ऑगस्टपासून आझाद मैदानावर बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा राज्यभरातील नोंदणीकृत कंत्राटदारांनी दिला आहे.

आदिवासी वाड्या-पाड्यांना जोडणारे रस्ते आणि पुलांची डिसेंबर २०२४ पर्यंत सुमारे १२ हजार कोटी रुपयांची कामे पूर्ण झाली आहेत. मात्र, गेल्या २० महिन्यांत शासनाने केवळ २ हजार कोटी रुपये अदा केले आहेत. कंत्राटदारांनी स्वतःची बचत, बँक कर्जे, खासगी सावकारी व दागिने गहाण ठेवून ही कामे केली आहेत. आर्थिक कोंडीमुळे अनेक जण तणावाखाली असून काहींनी आत्महत्या केल्याचा दावा कंत्राटदारांनी केला आहे. वारंवार निवेदने देऊनही ठोस दखल न घेतल्याने कंत्राटदारांनी शासनाला १५ ऑगस्टपर्यंत मुदत दिली आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणात देणी प्रलंबित असतानाही शासनाकडून या योजनेची वार्षिक आर्थिक तरतूद सातत्याने कमी करण्यात येत आहे. २०२३-२४ मध्ये १,४५० कोटी, २०२४-२५ मध्ये ९३१ कोटी, २०२५-२६ मध्ये २८० कोटी तर २०२६-२७ या वर्षासाठी ८०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

मंत्री महोदयांसोबत झालेल्या बैठकीला महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर्स फेडरेशनचे अध्यक्ष मनोज खांडेकर, उपाध्यक्ष किसनशेठ पानसरे, महाराष्ट्र मजूर फेडरेशनचे संचालक शशिकांत आव्हाड, एमसीएचे मुकुंद काकड, बाजीराव दराडे, अजय पाचपुते, जनार्दन सांगळे, पालघर प्रतिनिधी हिमालय पाटील, दत्ता शेलार, दिंडोरी प्रतिनिधी रामदास दळवी, तुषार लोणारी, निलेश पाटील, सचिन पटपुरे आणि विनोद जाधव आदी उपस्थित होते.

# दोडीतील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी आरोपींवर कठोर कारवाई करा

## संगमनेर कुंभार समाजाची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-सिन्नर तालुक्यातील दोडी बु. येथे अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप असून, या प्रकरणाची तक्रार मागे घेण्यासाठी पीडित कुटुंबीयांवर दबाव आणल्याचा तसेच तीन लाख रुपयांची लाच देण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप संगमनेर तालुका कुंभार समाजाच्या वतीने करण्यात आला आहे. या प्रकरणातील पीडित मुलीच्या आजीचे अपहरण करून तिची हत्या करण्यात आल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुका कुंभार समाजाच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर यांना निवेदन देण्यात आले. संबंधित प्रकरणाचा तातडीने व निष्पक्ष तपास करून आरोपींवर कठोर कारवाई करावी, तसेच आरोपींना राजकीय अथवा अन्य कोणाचे पाठबळ असल्यास त्याचीही चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ग्रामीण भागात काही मुजोर व्यक्तींकडून सर्वसामान्य नागरिकांना त्रास दिला जात असून, त्यांच्या प्रभावामुळे नागरिक तक्रार करण्यास घाबरतात, असा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. तक्रार करणाऱ्या व्यक्तींना जीवाला मुकावे लागण्याची भीती निर्माण झाली असल्याने या घटनेकडे अत्यंत गांभीर्याने पाहण्याची मागणी समाजाच्या वतीने करण्यात आली.

आठ दिवसांत आरोपींना अटक करून कठोर शासन करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच तपासात दिरंगाई झाल्यास किंवा संबंधित आरोपींना कायदेशीर कारवाईपासून वाचविण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संगमनेर तालुका कुंभार समाजाने दिला आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची पोलिसांकडून सखोल चौकशी होणे आणि दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याची भूमिका समाजाच्या वतीने मांडण्यात आली आहे. या निवेदनावर कैलास वाकचौरे, संतोष जोर्वेकर, पंकज जोर्वेकर, मच्छिंद्र जोर्वेकर बाळासाहेब जोर्वेकर, दत्तू जोर्वेकर, शंभू जोर्वेकर आदिंसह अनेकांच्या सह्या आहेत.

# 'वंदे मातरम्'ला 'जन-गण-मन' इतकेच कायदेशीर संरक्षण

## ३ वर्षांपर्यंत कारावासाची तरतूद



नवी दिल्ली (वृत्तसस्था)

राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम् चा अवमान करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण (सुधारणा) विधेयक २०२६' ला मंजुरी दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे आता राष्ट्रीय गीत असलेल्या 'वंदे मातरम्ला राष्ट्रगीत 'जन-गण-मन'प्रमाणेच समान कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले आहे. संसदेने गेल्या महिन्यात 'राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान निवारण कायदा, १९७१' मध्ये सुधारणा करणारे हे महत्त्वपूर्ण विधेयक बहुमताने मंजूर केले होते. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर आता या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले असून संपूर्ण देशात हा नियम लागू झाला आहे.

कायद्यानुसार, 'वंदे मातरम् चे गायन रोखणे किंवा गायन चालू असताना त्यात अडथळा निर्माण करणे हा गंभीर गुन्हा मानला जाईल. असा गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला ३ वर्षांपर्यंतचा कारावास, दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. जर एखाद्या व्यक्तीने हा गुन्हा पुन्हा केला, तर त्याला किमान १ वर्षाच्या कारावासाची तरतूद करण्यात आली आहे. याआधी १९७१ च्या मूळ कायद्यात केवळ राष्ट्रगीत 'जन-गण-मन'च्या अवमानाबाबतच शिक्षेची तरतूद होती. 'वंदे मातरम् ला राष्ट्रीय गीताचा दर्जा असूनही असा कोणताही थेट कायदेशीर आधार उपलब्ध नव्हता. हीच त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने कलम ३ मध्ये सुधारणा करून 'वंदे मातरम्'चा यामध्ये समावेश केला आहे.विधेयकात २४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात बंकीमचंद्र चट्टोपाध्याय लिखित 'वंदे मातरम् या गीताने अतुलनीय योगदान दिले होते. म्हणूनच, 'वंदे मातरम् ला राष्ट्रगीत 'जन-गण-मन'सारखाच दर्जा आणि सन्मान दिला गेला पाहिजे, अशी भूमिका घटना समितीने मांडली होती. कायद्यातील या सुधारणेमुळे घटना समितीच्या भूमिकेला आज कायदेशीर बळ मिळाले आहे.

यावर्षीच्या स्वातंत्र्यदिनी पहिल्यांदाच लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून वंदे मातरम् चे गायन केले जाणार आहे.

# मनमाड रस्त्याच्या दुरावस्थे विरोधात संतापाचा उद्रेक

## २५ ऑगस्टपासून संजय काळेंची 'विवस्त्र वारी'


युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - सावळीविहीर फाटा ते अहिल्यानगर या राष्ट्रीय महामार्गाची गेल्या दोन दशकांपासून झालेली दुरवस्था, खड्डे, धुळीचे साम्राज्य आणि रखडलेली कामे यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. वारंवार तक्रारी, निवेदने, बैठका आणि आंदोलने होऊनही रस्त्याची परिस्थिती सुधारत नसल्याने ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते संजय भास्करराव काळे यांनी आता आक्रमक आंदोलनाची घोषणा केली आहे.

शासनाने रस्त्याची वाट लावून जनतेला नागडे केले आहे. त्यामुळे नागड्या जिल्ह्याचा प्रतिनिधी म्हणून मी स्वतः विवस्त्र चालणार, असा संतप्त इशारा काळे यांनी दिला.

सावळीविहीर फाटा ते अहिल्यानगरदरम्यानच्या महामार्गावर मोठमोठे खड्डे, धूळ आणि अर्धवट कामांमुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या मार्गावर झालेल्या अपघातांत अनेकांना जीव गमवावा लागला असून, अनेक जण कायमचे अपंग झाले आहेत. तरीही प्रशासनाकडून ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याचा आरोप काळे यांनी केला. रस्त्याच्या दुरवस्थेकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी काळे यांनी २५ ऑगस्टपासून आठ दिवसांच्या 'विवस्त्र वारी'ची घोषणा केली आहे. वयाची ६४ वर्षे आणि गुडघ्याचे लिगामेंट खराब झालेले असतानाही भावी पिढीचे भवितव्य आणि साईभक्तांचा सुरक्षित प्रवास यासाठी हे आंदोलन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

२००६ मध्ये वटवृक्ष तोडून रस्ता बोडखा केला. गेल्या २० वर्षांत नेत्यांच्या तीन पिढ्या मोठ्या झाल्या; मात्र रस्ता आजही खड्ड्यातच आहे. आता जनतेची लाज राखण्यासाठी केवळ कंबर



झाकून दररोज सकाळी ९ वाजता पायी प्रवास सुरू करणार आहे असे काळे यांनी स्पष्ट केले.

हे आंदोलन आठ टप्प्यांत पार पडणार असून, सावळीविहीर फाट्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पायी प्रवास करून प्रशासनाचे लक्ष वेधले जाणार आहे. महामार्गाच्या दुरवस्थेला जबाबदार असलेल्या यंत्रणांनी तातडीने रस्त्याचे काम पूर्ण करावे आणि नागरिकांना सुरक्षित प्रवासाची हमी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

काळे यांच्या या अनोख्या आंदोलनाच्या घोषणेमुळे स्थानिक राजकीय वर्तुळासह प्रशासकीय यंत्रणेतही खळबळ उडाली असून, आता प्रशासन या आंदोलनाची दखल घेऊन महामार्गाच्या प्रश्नावर कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# एसएमबीटीत १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान 'मोफत कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी शिबिर'




युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - हृदयविकाराच्या अत्यंत गंभीर समस्यांनी ग्रस्त असलेल्या, ज्यांना इतर डॉक्टरांनी बायपास सर्जरीचा सल्ला दिला आहे किंवा ज्यांच्याबाबत 'अँजिओप्लास्टी होऊ शकत नाही' असे सांगण्यात आले आहे, अशा रुग्णांसाठी एक मोठी दिलासादायक बातमी आहे. एसएमबीटी हॉस्पिटल, नंदी हिल्स, ता. इगतपुरी येथील एसएमबीटी हॉस्पिटल आणि एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूट यांच्या वतीने १३ ते १५ ऑगस्ट २०२६ दरम्यान 'मोफत कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत पार पडणार असून, 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजने'अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत.

या तीन दिवसीय शिबिरामध्ये आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कार्डियाक उपचार तज्ज्ञ डॉ. व्ही. सूर्यप्रकाश राव (संस्थापक, इंडो-जपानीज सीटीओ क्लब) आणि एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर व वरिष्ठ हृदयविकार तज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा हे रुग्णांची तपासणी करून अँजिओप्लास्टी करणार आहेत तसेच उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. अनेकदा रुग्णांना तीनही धमन्यांमध्ये ब्लॉक असणे, १००% जुने ब्लॉक असणे किंवा आधी अँजिओप्लास्टी करण्याचा प्रयत्न अपयशी ठरलेला असणे अशा परिस्थितीला सामोरे जावे लागते. अशा वेळी बहुतेक ठिकाणी थेट बायपासचाच सल्ला दिला जातो. मात्र, या शिबिरामध्ये सर्व प्रकारच्या जटिल आणि गुंतागुंतीच्या अँजिओप्लास्टी आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अत्यंत सुरक्षितपणे पार पाडल्या जाणार आहेत. त्यामुळे बायपास टाळू इच्छिणाऱ्या आणि उपचाराची आशा सोडलेल्या रुग्णांसाठी हे शिबिर अतिशय महत्त्वाचे ठरणार आहे.

या शिबिरामध्ये क्रॉनिक टोटल ऑक्लुजन अँजिओप्लास्टी, सर्व प्रकारच्या जटिल व गुंतागुंतीच्या अँजिओप्लास्टी, लेफ्ट मेन व बायफर्केशन अँजिओप्लास्टी, रोटेशनल थरेक्टॉमी, IVUS व OCT इमेजिंग तंत्रज्ञान, तसेच हार्ट अटॅकदरम्यान तातडीने केली जाणारी 'प्रायमरी पीसीआय' यांसारख्या अत्याधुनिक सुविधांचा समावेश आहे.

शिबिरासंदर्भात अधिक माहिती व नावनोंदणीसाठी आकाश सगळे (मो. ७७४४९१३९१३) यांच्याशी संपर्क साधावा. तसेच एसएमबीटी हॉस्पिटल, नंदी हिल्स (ता. इगतपुरी, जि. नाशिक - ०२५३ ६९४ ००००) येथे भेट देण्याचे आवाहन एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.

**बायपास टाळणाऱ्यांसाठी 'कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी' ठरणार वरदान-** आमच्याकडे होणाऱ्या या शिबिरात अतिगुंतागुंतीच्या हृदयविकारांवर उपचार केले जाणार आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी अँजिओप्लास्टी अशक्य सांगून बायपासचा सल्ला दिला आहे, मात्र रुग्ण बायपाससाठी सक्षम नाही, अशांवर येथे 'कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी' केली जाईल. एसएमबीटीमध्ये अशा अँजिओप्लास्टी नेहमीच होतात; मात्र या शिबिरासाठी आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ डॉ. व्ही. सूर्यप्रकाश राव उपस्थित राहणार आहेत. याचा फायदा रेफर केलेल्या रुग्णांना तर होईलच, शिवाय स्थानिक डॉक्टरांसाठीही कार्यशाळेच्या माध्यमातून शिकण्याची ही मोठी पर्वणी असल्याचे एसएमबीडीचे डायरेक्टर व वरिष्ठ हृदयविकार तज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा यांनी सांगितले.

**सर्व अत्याधुनिक यंत्रणा आणि आयसीयू बॅकअप उपलब्ध-** अशा प्रकारच्या अँजिओप्लास्टी खूप गुंतागुंतीच्या असतात. यासाठी एसएमबीटीमध्ये सर्व प्रकारची आधुनिक साधनसामग्री उपलब्ध आहे. आमच्याकडे कार्डियाक आयसीयूचा भक्कम बॅकअप, अल्ट्रा मॉड्युलर कॅथलॅब आणि २४ तास तज्ज्ञ डॉक्टरांची टीम सेवेत असते. त्यामुळे अत्यवस्थ किंवा हलाखीच्या परिस्थितीत असलेल्या रुग्णांवरही सहज व सुलभ उपचार शक्य असल्याचे एसएमबीटीचे डायरेक्टर - हेल्थकेअर सचिन बोरसे यांनी सांगितले.

# गणेशोत्सवात 'डिजिटल पावती'चा अभिनव प्रयोग

## बाजारपेठ व्यापारी मित्र मंडळाचा पर्यावरणपूरक पुढाकार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी नवनवीन आणि अभिनव उपक्रम राबविणाऱ्या संगमनेर येथील बाजारपेठ व्यापारी मित्र मंडळाने यंदा तंत्रज्ञान आणि पर्यावरण संवर्धनाची सांगड घालत अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. मंडळाने वर्गणी जमा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पारंपरिक कागदी पावती पुस्तकांचा वापर पूर्णपणे बंद करून यंदापासून 'डिजिटल पावती पुस्तक' अर्थात झरशिश्रशीी ठशलशळर्ी -ििसुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. असा उपक्रम राबविणारे हे संगमनेर शहरातील पहिले गणेश मंडळ ठरले आहे.

मंडळाचे मार्गदर्शक व नगरसेवक योगेशजी (चिकू) जाजू यांनी ही संकल्पना मांडली. त्यास अध्यक्ष सुधीरजी क्षीरसागर, उपाध्यक्ष शिवमूतजी बोखारे, खजिनदार राजेशजी जोशी, कार्याध्यक्ष कपिलजी टाक, सचिव कुणालजी डंबिर यांच्यासह सर्व सदस्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत संमती दिली.

गणेशोत्सवासाठी वर्गणी जमा करताना दरवर्षी मोठ्या प्रमाणात पावती पुस्तिकांचा वापर होतो. मात्र, सर्वच क्षेत्रांत डिजिटल आणि पेपरलेस व्यवहारांना प्राधान्य दिले जात असताना गणेशोत्सवासारख्या मोठ्या उत्सवातही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, या उद्देशाने मंडळाने हे मोबाईल प्लिकेशन तयार केले आहे. आता मंडळाचे कार्यकर्ते वर्गणी जमा करण्यासाठी घरोघरी किंवा दुकानांमध्ये जाताना पावती पुस्तके सोबत न नेता मोबाईल पद्धारे व्यवहाराची नोंद करतील. वर्गणीदाराला तत्काळ त्याच्या मोबाईलवर डिजिटल पावती पाठविण्यात येणार आहे.

पर्यावरणासह अनेक फायदे

या उपक्रमामुळे मोठ्या प्रमाणात कागदाची बचत होणार असून हजारो पानांचा वापर टाळला जाणार आहे. त्यामुळे वृक्षतोड रोखण्यास आणि पर्यावरण संवर्धनास हातभार लागणार आहे. विशेष म्हणजे, कागदी पावत्यांवर छापण्यात येणाऱ्या श्री गणपतीच्या प्रतिमा जुन्या झाल्यानंतर किंवा पावत्या रस्त्यावर अथवा कचऱ्यात पडल्याने होणारी देवतांच्या चित्रांची विटंबनाही या डिजिटल पद्धतीमुळे टाळता येणार आहे.

पावती पुस्तके छापण्याचा खर्च वाचण्याबरोबरच कार्यकर्त्यांचा वेळही मोठ्या प्रमाणात वाचणार आहे. तसेच वर्गणीदाराला मिळालेली डिजिटल पावती मोबाईलमध्ये सुरक्षित राहणार असून ती व्हॉट्सप किंवा संदेशाद्वारे कधीही पाहता येणार आहे. तंत्रज्ञानाची कास धरत असतानाच निसर्गाचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे. बाजारपेठ व्यापारी मित्र मंडळाचा हा डिजिटल आणि पर्यावरणपूरक उपक्रम संगमनेरमधील इतर गणेश मंडळांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. दरम्यान, नगरसेवक योगेशजी (चिकू) जाजू यांच्या या अभिनव संकल्पनेचे संगमनेरकर आणि गणेशभक्तांकडून कौतुक होत असून, 'गणपती उत्सवही डिजिटल आणि पर्यावरणपूरक' करण्याच्या दिशेने बाजारपेठ व्यापारी मित्र मंडळाने एक आदर्श पाऊल टाकल्याची चर्चा शहरात आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्यूरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसारासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा - ॲड. गवांदे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार आणि प्रसाराचे कार्य करत आहे. राज्यघटनेत नमूद केल्याप्रमाणे विधायक मार्गाने धर्माची चिकित्सा केली तर अशा शोषणाला समाज बळी पडणार नाही. प्रबोधनाच्या कार्यात सहभागी होऊन शोषणमुक्त समाज निर्मितीसाठी युवकांनीपुढाकार घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र अंनिसच्या बुवाबाजी विभागाच्या सचिव ड रंजना गवांदे यांनी केले.

जागतिक आदिवासी दिन, क्रांती दिन आणि अंनिस स्थापना दिनानिमित्त लोणी येथील शासकीय आदिवासी मुलांचे वसतिगृहात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चमत्कार सादरीकरण या कार्यक्रमात ड रंजना गवांदे बोलत होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अंनिसचे संस्थापक शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर, जुलमी सत्तेविरुद्ध आदिवासींच्या हक्कासाठी लढणारे क्रांती राणी दुर्गावती, बिरसा मुंडा आणि राघोजी भांगरे यांच्या स्मृतीला अभिवादन केले. वसतिगृह अधीक्षक राहुल शिरसाठ, अंनिस जिल्हा शाखेचे प्रधान सचिव अशोक गवांदे, कार्याध्यक्ष काशिनाथ गुंजाळ, हरिभाऊ उगले, सुधीर नेहे उपस्थित होते.

ॲड. रंजना गवांदे म्हणाल्या, दैवी शक्तीचा दावा करून विज्ञानाच्या मदतीने चमत्कार करणाऱ्या भोंदूंची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. हे भोंदू बुवा बाबा श्रद्धेच्या आणि धर्माच्या नावाखाली आपली दुकानदारी सुरू करून समाजाचे शोषण करतात. यात विशेषतः महिलांचे आर्थिक, मानसिक आणि शारीरिक शोषण केले जाते. अंधश्रद्धेच्या जाळ्यातून समाज मुक्त व्हावा म्हणून डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली. त्या माध्यमातून विज्ञानवादी आणि विवेकाधिष्ठित समाज निर्मिती करण्याचा प्रयत्न केला. अनिष्ट रूढी परंपरा आणि अंधश्रद्धानांवर प्रहार करणारे प्रबोधनात्मक गीत सादर केले. ॲड. रंजना गवांदे आणि महाराष्ट्र अंनिस संगमनेर शाखेचे कार्याध्यक्ष काशिनाथ गुंजाळ यांनी चमत्कार सादर करत त्यामागील विज्ञान आणि हातचलाखी याबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती दिली.

# कोकमठाणमध्ये जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा !

## राज्यस्तरीय संघात जाण्याचीही संधी

### विविध सहा प्रकारांचा समावेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर जिल्हा योगासन स्पोर्ट असोसिएशनच्या वतीने सातव्या अहिल्यानगर जिल्हास्तरीय योगासन क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण येथील समता इंटरनॅशनल स्कूलच्या क्रीडासंकुलात १६ व १७ ऑगस्ट रोजी या स्पर्धा पार पडणार असून, जिल्ह्यातील योगासनपटूंना राज्यस्तरीय संघात जाण्याचीही संधी मिळणार असल्याची माहिती असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.संजय मालपाणी यांनी दिली.

रविवार व सोमवार अशा दोन दिवस चालणार्या या स्पर्धेत पहिल्या दिवशी मुली व महिलांच्या तर दुसर्या दिवशी मुलांसह पुरुष गटातील सामने होणार आहेत. पारंपारिक, कलात्मक एकल, कलात्मक दुहेरी, तालात्मक दुहेरी, पारंपारिक सांघिक व कलात्मक सांघिक अशा योगसनांच्या सहा प्रकारांमध्ये ही स्पर्धा होणार आहे.

या स्पर्धेत सब ज्युनिअर (१० ते १४ वर्षे), ज्युनिअर (१४ ते १८ वर्षे), सीनियर (१८ ते २८ वर्षे), सीनियर 'अ' (२५ ते ३५ वर्षे), सीनियर 'ब' (३५ ते ४५ वर्षे) आणि सीनियर 'क' (४५ ते ५५ वर्षे) असे विविध वयोगट निश्चित करण्यात आले आहेत. ऑनलाइन नोंदणी गुरुवारपर्यंत (ता.१३) सुरु राहणार असून स्पर्धकांनी नोंदणीची पडताळणी व कागदपत्रे जमा करण्यासाठी रविवारी सकाळी ८ वाजता स्पर्धास्थळी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. या स्पर्धेतून उत्कृष्ट कामगिरी करणार्या खेळाडूंची राज्यस्तरीय योगासन क्रीडा स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा संघात निवड केली जाणार आहे. संघटनेचे अध्यक्ष डॉ.संजय मालपाणी यांनी जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवून राज्यस्तरावर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करावे, असे आवाहन केले आहे. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सेक्रेटरी उमेश झोटिंग, कोषाध्यक्ष कुलदीप कागडे व प्रज्वल ढाकणे कार्यरत आहेत.

पान १ वरून

## संसदेत ....

केवळ भाष्य करून किंवा काल्पनिक गोष्टी सांगून मूळ मुद्द्यावरून लक्ष भरकटवता येणार नाही. गृहमंत्री अमित शाह यांच्या कार्यपद्धतीवर टीका करताना राहुल गांधी पुढे म्हणाले, गेल्या २० दिवसांपासून गृहमंत्री गायब असल्यासारखे होते. ते संसदेत यायचे-जायचे, पण या गंभीर विषयावर काहीही बोलत नव्हते. आता शेवटी संसदेत येऊन बोलणे म्हणजे हवेतून फुगा निघून गेल्यावर पुन्हा त्यात गॅस भरण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे.

पत्रकार परिषदेदरम्यान काही पत्रकारांनी मध्येच प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केल्यानंतर राहुल गांधी यांनी मीडियाच्या वर्तनावरही तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, आम्ही बोलत असताना २४ तास हस्तक्षेप केला जातो. मग सत्ताधाऱ्यांसमोर संपूर्ण मीडिया असा गप्प का उभा राहतो? त्यांना प्रश्न विचारण्याचे धाडस का दाखवले जात नाही?

# धांदरफळ खुर्द स्कूल कमिटीच्या अध्यक्षपदी सतीश कोकणे यांची निवड




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील धांदरफळ खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेच्या स्थानिक स्कूल कमिटीची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी सतीश कोकणे, तर उपाध्यक्षपदी रूपाली खताळ यांची निवड करण्यात आली.

नूतन कार्यकारिणीत सदस्य म्हणून प्रविण कोकणे, सोनाली कचेरे, अमोल खताळ, आशा निळे, स्वाती कोकणे, शुभांगी ठोंबरे, अश्विनी खताळ आणि सतीश खताळ यांची निवड झाली आहे. नूतन अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचे शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, पालक तसेच ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नूतन कार्यकारिणीच्या माध्यमातून सकारात्मक व प्रभावी काम केले जाईल, असे नवनिर्वाचित अध्यक्ष सतीश कोकणे यांनी सांगितले.

# अमृतेश्वर मंदिरात गुरूवार पासून अखंड हरिनाम सप्ताह

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सह.साखर कारखाना येथील अमृतेश्वर मंदिर प्रांगणात काँग्रेसचे वरिष्ठ नेते मा.आ.बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार दि.१३ ऑगस्ट ते गुरुवार २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर व सांस्कृतिक मंडळाचे कार्याध्यक्ष रामदास तांबडे यांनी दिली आहे.



वै.स्वानंद सुखनिवासी गुरुवर्य ह.भ.प रामभाऊ महाराज गावडे यांचे प्रेरणेने व ह.भ.प. गुरुवर्य कलामाई यांचे कृपाशिर्वादाने व ह.भ.प.गोविंद महाराज करंजकर तसेच ह.भ.प.चंद्रलेखाताई काकडे यांचे मार्गदर्शनाखाली सलग ४१ व्या वर्षी या सप्ताहाचे आयोजन होत आहे. या सप्ताहाची घटस्थापना गुरुवार दि.१३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वा पांडुरंग घुले व त्यांच्या सुविद्य पत्नी प्रतिभाताई पांडुरंग घुले यांच्या शुभहस्ते होणार आहे. या सप्ताहात सकाळी ५ ते ६ काकड भजन,सकाळी ८ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण, सकाळी ११ ते १२ गाथा भजन,सायं.४.३० ते ५.३० सामु.हरिपाठ, सायं.५.३० ते ६.३० ज्ञानेश्वरी प्रवचन,सायं ७ ते ९ हरिकिर्तन नंतर हरिजागर होणार आहे.

यामध्ये गुरुवार दि.१३ ऑगस्ट ते गुरुवार दि. २०ऑगस्ट २०२६ पर्यंत ह.भ.प.हिराबाई जोंधळे (संगमनेर), ह.भ.प. सोनालीताई नरोडे (सायखींडी) ह.भ.प.शशिकलाताई सूर्यवंशी (संगमनेर ), ह.भ.प.मीनाताई सुपेकर (घुलेवाडी), ह.भ.प.आशाताई वर्पे (आळंदी), ह.भ.प.अलकाताई मोहटे (आळंदी), ह.भ.प.चंद्रलेखाताई काकडे( संगमनेर) संपूर्ण सप्ताह काळात दररोज ज्ञानेश्वरी अध्याय प्रवचन सेवा देणार आहे.

गुरुवार दि. १३/०८/२०२६ रोजी जयश्रीताई तिकांडे ( राजापूर ), शुक्रवार दि.१४ रोजी ह.भ.प. जगन्नाथ महाराज उंबरकर ( उंबरी ),शनिवार दि.१५ रोजी ह.भ.प. शरद महाराज ढवळे ( काकडवाडी ), रविवार दि.१६ रोजी ह.भ.प.अरुण महाराज फरगडे ( निमगाव पागा ), सोमवार दि.१७ रोजी ह.भ.प.व्यंकटेश महाराज सोनवणे ( निमगाव भोजापूर ) , मंगळवार दि. १८ रोजी गोविंद महाराज करंजकर ( बीड ), बुधवार दि..१९ रोजी सुदाम महाराज कोकणे ( धांदरफळ ) यांचे कीर्तन सेवा होणार होणार असून गुरुवार दि.२०/०८/२०२६ सकाळी ९. ते ११ कथा प्रवक्ते व कीर्तनकार ह.भ.प पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा) यांचे काल्याचे कीर्तन व सोहळ्याची सांगता होईल. दीपोत्सव बुधवार १९/०८/२०२६ रोजी सायं.६.३० कारखान्याचे चेअरमन लोकनेते मा.आ. बाळासाहेब थोरात व सौ.कांचनताई थोरात यांच्या हस्ते होणार आहे. असून यावेळी मा.आ.डॉ.सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, आ.सत्यजीत तांबे, इंद्रजित थोरात, डॉ.जयश्रीताई थोरात, व्हा. चेअरमन पांडुरंग पा. घुले यांचे सह कारखान्याचे सर्व संचालक मंडळ उपस्थित राहणार आहे.

# श्रावण : भक्ती, संस्कृती आणि आत्मचिंतनाचा पवित्र संगम



सण आणि उत्सवांचा राजा म्हणून ओळखला जाणारा श्रावण महिना आजपासून सुरू होत आहे. निसर्गाचे लोभस सौंदर्य, देवाची आराधना, धार्मिक परंपरा आणि भारतीय संस्कृतीचा सुंदर संगम या महिन्यात अनुभवायला मिळतो. पृथ्वीने पांघरलेला हिरवागार शालू, सर्वत्र झालेली निसर्गाची रंगांची उधळण आणि भक्तिमय वातावरण यामुळे श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

श्रावण महिना हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र काळ मानला जातो. या महिन्यात भगवान शिवाची उपासना करण्याला विशेष महत्त्व आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवार शिवभक्तांसाठी विशेष मानला जातो. उपवास, शिवपूजन, अभिषेक, मंदिरदर्शन आणि धार्मिक ग्रंथांचे वाचन अशा विविध माध्यमांतून भक्तीची अनुभूती घेतली जाते.

'श्रवण' या शब्दावरून 'श्रावण' हे नाव आले असे मानले जाते. त्यामुळे या महिन्यात शुभ श्रवण, शुभ कथन, शुभचिंतन, शुभदर्शन आणि शुभ मनन करण्याची परंपरा आहे. पूर्वीच्या काळी श्रावण महिन्यात संगमनेरमधील अनेक घरांमध्ये संध्याकाळच्या वेळी नवनाथ पोथी, शिवपुराण, शिवस्तुती यांचे वाचन व पारायण केले जात असे. त्यामुळे घराघरांत आणि परिसरात एक वेगळेच धार्मिक व आध्यात्मिक वातावरण निर्माण होत असे. मात्र, आधुनिक जीवनशैलीच्या धावपळीत ही परंपरा आता क्वचितच दिसून येते.

श्रावणातील शिवोपासनेमागे केवळ धार्मिक श्रद्धाच नाही, तर जीवनाला दिशा देणारा आध्यात्मिक विचारही आहे. 'शिव' म्हणजे कल्याण, प्रकाश, सत्य, पवित्रता आणि मंगलमयता. भगवान शिवाची पाच प्रमुख कर्मे सांगितली जातात-सृष्टीची रचना, पालन, संहार, अनुग्रह आणि तिरोभाव. शिवपुराणात कलियुगाचे स्वरूप सांगताना मानवी जीवनातील अधःपतनाचेही वर्णन आढळते. दुराचार, अत्याचार, विकार, वासना आणि विघातक प्रवृत्ती वाढतील, सत्याची अभिलाषा कमी होईल, असे त्यात सांगितले आहे. आजच्या परिस्थितीकडे पाहिले तर या वर्णनातील अनेक गोष्टी वास्तवातही जाणवत असल्याचे दिसते.

अशा परिस्थितीत जीवनाला योग्य दिशा देण्यासाठी काय करावे, हा प्रश्न उपस्थित होतो. त्यावर शिवपुराणाचे वाचन, श्रवण, मनन आणि चिंतन हा मार्ग सांगितला जातो. मनुष्य जन्माला आल्यानंतर जीवनाचे अंतिम ध्येय काय असावे, आपण नेमके काय साध्य करायचे, या प्रश्नांची उत्तरेही अध्यात्मातून मिळतात. आजच्या भौतिक जीवनात 'खा, प्या आणि मजा करा' यापलीकडे जीवनाचे ध्येय काय, याचा विचार अनेकदा होत नाही. मात्र, शिवपुराण जीवनाचे अंतिम साध्य स्पष्टपणे सांगते-'साध्यं शिवपदप्राप्तिः'. म्हणजेच जीवाने शिवाकडे, सत्याकडे, प्रकाशाकडे, मंगलाकडे आणि कल्याणाकडे वाटचाल करणे हे जीवनाचे परम साध्य आहे. त्यासाठी शिवाची आराधना आणि आत्मशुद्धी महत्त्वाची आहे. 'शिवो भूत्वा शिवं यजेत'-स्वतःमध्ये शिवत्व निर्माण करून शिवाची उपासना करावी, हा त्यामागील व्यापक संदेश आहे. संगमनेर परिसरातही श्रावण महिन्यात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळते. खांडगाव येथील निझर्णेश्वर, बाळेश्वर, सोमेश्वर, अग्नेश्वर यांसह शहर व परिसरातील विविध महादेव मंदिरांमध्ये श्रावणातील पूजा-अर्चा, अभिषेक आणि धार्मिक कार्यक्रम सुरू होतात. लहान-मोठी शिवमंदिरेही भक्तिभावाने फुलून जातात. भवानी बागेतील महादेव मंदिरात तर प्रत्येक सोमवारी भाविकांची मोठी गर्दी होत असून, भक्तीमय वातावरणात यात्रेचे स्वरूप निर्माण होते. श्रावणातील प्रत्येक सोमवार हा शिवभक्तांसाठी श्रद्धेचा आणि साधनेचा दिवस असतो. अनेक शिवभक्त पायी मंदिरदर्शनासाठी जातात, अभिषेक करतात आणि भक्तीचा आनंद अनुभवतात. या निमित्ताने शरीर, मन आणि विचारांची शुद्धी करण्याचा प्रयत्न केला जातो. श्रावण म्हणजे केवळ सण-उत्सवांचा महिना नव्हे; तो निसर्गाशी नाते जोडण्याचा, संस्कृतीच्या परंपरा जपण्याचा, मनाला शांत करण्याचा आणि आत्मचिंतन करण्याचा काळ आहे. बदलत्या काळात जुन्या परंपरांना आधुनिक जीवनाशी जोडत त्यातील चांगले संस्कार पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे.

भक्ती, श्रद्धा, संस्कृती, निसर्ग आणि आत्मचिंतन यांचा सुंदर संगम असलेला हा पवित्र श्रावण महिना प्रत्येकाच्या जीवनात आनंद, शांती, प्रकाश आणि कल्याण घेऊन येवो, हीच प्रार्थना.

**प्रा. शशांक गंधे**
**संगमनेर, जि. अहिल्यानगर**
**मोबा.९८९०१६३६४२**

# सर्वोदय विद्या मंदिर कातळापूर विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - ना. वि. देशमुख सर्वोदय विद्या मंदिर कातळापूर विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. गेल्या सतरा वर्षा पासुन मा.विजयराव शिवराम पवार (उद्योजक मुंबई) विद्यालयातील १२ गरीब, गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेतात व त्याचा वर्ष भराचा सर्व शैक्षणिक खर्च उचलतात. त्या मुळे आता पर्यंत अनेक विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे.या मदतीने अनेक विद्यार्थी शाळेच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदत झाली आहे.

यावर्षीही १२ दत्तक विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तके, वह्या, कंपास, रंगपेटी, परीक्षा फी ,सहल खर्च त्यांनी दिला. तसेच गरजवंत २५ विद्यार्थ्यांना शालेय गणवेश दिला. याबद्दल सत्यनिकेतन संस्थेचे सचिव एम. एल. मुठे, व्ही. डी.पवार ( संचालक) व शाळा समिती अध्यक्ष रामजी काठे यांनी प्रत्यक्ष कार्यक्रमास उपस्थित राहून देणगीदारांचे आभार मानले. याप्रसंगी विजयराव पवार यांनी विद्यार्थ्यांना सांगीतले की विद्यार्थ्याचा उत्तम माणूस घडवण्याचे काम शाळेत होत असते. म्हणून शिक्षणा शिवाय आपल्याला पर्याय नाही. सद्याच्या काळात बुद्धीवंताना मोठ मोठ्या संधी चालून येतात. म्हणून तुम्ही मन लावून आणि प्रामाणिकपणे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत राहा. यश निश्चीत मिळेल. शिक्षणामुळे तुमच्या यशस्वी जीवनाचा पाय रचला जातो. तुम्हाला कोणत्याही प्रकारची अडचण आली तर आमच्याशी निसंकोच पणे सांगा आम्ही ती सोडवू. दिलेल्या साहित्याचा योग्य वापर करा. या प्रसंगी सरपंच मा. बाळासाहेब ढगे प्राचार्य बनकर सर, प्राचार्य मोखरे, शिक्षण निरीक्षक लहानु पर्बत, सौ.आशा पवार, शर्वरी कांबळे, अक्षय पवार, वसतिगृह अधिक्षक पांडुरंग मुठे आदि मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मालुंजकर जी.बी. यांनी केले व सूत्रसंचालन अनिल पवार यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक वृंद यांनी सहकार्य केले.

## संपादकीय...

# महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न आज पुन्हा एकदा गंभीरपणे ऐरणीवर आला आहे. देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि आर्थिक विकासाच्या क्षेत्रात मोठी झेप घेतली असली, तरी महिलांवरील अत्याचारांच्या घटना थांबताना दिसत नाहीत. घरापासून कार्यस्थळापर्यंत, रस्त्यापासून सार्वजनिक वाहतुकीपर्यंत आणि प्रत्यक्ष जगापासून सोशल मीडियापर्यंत महिलांना विविध प्रकारच्या छळाला सामोरे जावे लागत आहे. ही परिस्थिती केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून संपूर्ण समाजाच्या मानसिकतेसमोरील मोठे आव्हान आहे. महिलांवरील अत्याचारांमध्ये लैंगिक छळ, विनयभंग, कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी, बलात्कार, मानसिक छळ, पाठलाग, सायबर छळ आणि महिलांच्या चारित्र्यावर होणारे आक्षेप यांचा समावेश होतो. अनेक वेळा अत्याचार करणारी व्यक्तीच पीडित महिलेच्या परिचयातील असते. त्यामुळे महिलांसाठी घर आणि समाज दोन्ही ठिकाणी सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे. अत्याचाराच्या घटना घडल्यानंतर समाजात संताप व्यक्त होतो, आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली जाते; मात्र काही दिवसांनंतर हा विषय मागे पडतो. केवळ घटना घडल्यानंतर कठोर प्रतिक्रिया देऊन प्रश्न सुटणार नाही. महिलांविषयी असलेली पुरुषप्रधान आणि भेदभाव करणारी मानसिकता बदलणे आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी यांच्यात भेद न करता लहानपणापासूनच समानता, आदर आणि जबाबदारीची मूल्ये रुजवली पाहिजेत. महिलांच्या सुरक्षेसाठी कायदे अस्तित्वात आहेत. पोलिस यंत्रणा, न्यायव्यवस्था आणि प्रशासनाने या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. तक्रार दाखल करण्यापासून तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेपर्यंत पीडितेला सन्मानपूर्वक वागणूक मिळाली पाहिजे. प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्यास कायद्याचा धाक कमी होतो. त्यामुळे गंभीर गुन्ह्यांमध्ये जलद आणि निष्पक्ष तपास तसेच वेळेत न्याय मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. महिलांवरील अत्याचाराचा एक नवा चेहरा म्हणजे सायबर गुन्हे. सोशल मीडियावर अश्लील संदेश पाठवणे, फोटोचा गैरवापर करणे, बनावट खाते तयार करणे, ऑनलाइन बदनामी करणे आणि धमक्या देणे या प्रकारांमध्ये वाढ होत आहे. डिजिटल माध्यमांचा वापर वाढत असताना महिलांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक करणे आणि पोलिस यंत्रणेची तांत्रिक क्षमता वाढवणे आवश्यक आहे. महिलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी केवळ पोलिसांची नाही. कुटुंब, शाळा, महाविद्यालये, समाजसंस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रत्येक नागरिकाने यामध्ये भूमिका बजावली पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी पुरेशी प्रकाशव्यवस्था, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक, सीसीटीव्ही, तातडीची मदत व्यवस्था आणि संवेदनशील पोलिसिंग यामुळे महिलांना सुरक्षित वातावरण मिळू शकते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अत्याचार झालेल्या महिलेलाच दोष देण्याची सामाजिक मानसिकता बदलली पाहिजे. तिचे कपडे, तिचे वर्तन, ती कुठे गेली किंवा कोणासोबत होती, याऐवजी गुन्हा करणाऱ्या व्यक्तीच्या कृत्यावर प्रश्न उपस्थित झाले पाहिजेत. पीडितेला दोष देणे म्हणजे गुन्हेगाराला अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन देणे होय. महिला सुरक्षित असतील तरच समाज खऱ्या अर्थाने प्रगत म्हणता येईल. महिलांना संरक्षणाची भीक नव्हे, तर समान अधिकार, सन्मान आणि सुरक्षित वातावरण हवे आहे. कायद्याचा कठोर धाक, प्रशासनाची तत्परता आणि समाजाच्या मानसिकतेतील सकारात्मक बदल या तिन्ही गोष्टी एकत्र आल्या तरच महिला अत्याचारांना आळा घालता येईल. महिलांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारची असली, तरी महिलांचा सन्मान राखण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे. 'महिला सुरक्षित तर समाज सुरक्षित' हा विचार घोषणेत न राहता कृतीत उतरवण्याची वेळ आता आली आहे.

# देशासाठी लढणे महत्त्वाचेच; पण आधी देशाचा प्रामाणिक व सुजाण नागरिक व्हा - मेजर कोटकर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - देशासाठी लढणे महत्त्वाचेच; पण त्याआधी प्रत्येकाने देशाचा प्रामाणिक आणि सुजाण नागरिक होणे गरजेचे आहे,असा संदेश प्रमुख पाहुणे माजी सैनिक प्रकाश कोटकर ( अध्यक्ष, स्व. सै . कल्याण संस्था ) यांनी विद्यार्थ्यांना दिला. कारगिल युद्धातील अनुभव आणि मेजर विक्रम बत्रा यांच्या शौर्याशी संबंधित स्वानुभव कथन करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रप्रेमाची ज्योत प्रज्वलित केली. त्यांच्या प्रभावी भाषणाला 'ऐ मेरे वतन के लोगो' या अजरामर गीताची आणि देशप्रेमावर आधारित कव्वालीच्या सुरांची जोड मिळाल्याने विद्यालयातील वातावरण देशभक्तीने भारावून गेले.

विद्यालयात सोमवार, दि. ०९ ऑगस्ट रोजी क्रांती दिन, जागतिक आदिवासी दिन आणि ग्रंथालय दिन उत्साहपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या तिन्ही दिनांचे औचित्य साधत विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी, आदिवासी संस्कृतीविषयी आदर तसेच वाचनाची आवड निर्माण करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सैनिक भानुदास पोखरकर ( संस्थापक,स्व.सै.कल्याण संस्था ), पालक प्रतिनिधी एनएसजी कमांडो संतोष आहेर, प्रा . ज्योती पवार, तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम एरंडे,मेजर प्रतापराव ठोंबरे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते क्रांतीवीरांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

आपल्या प्रास्ताविकातून मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांनी क्रांती दिन, जागतिक आदिवासी दिन आणि ग्रंथालय दिन या तिन्ही दिवसांचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी सैनिक मा भानुदास पोखरकर यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रभक्ती व राष्ट्रप्रेम जागृत केले. राष्ट्र म्हणजे नागरिक, त्यांची संस्कृती, परंपरा आणि देशासाठी झटणारे सैनिक यांचा समुच्चय आहे . जसे सैनिक सीमेवर देशाचे रक्षण करतात तसे नागरिकांनी आपल्या कार्यक्षेत्रात प्रामाणिकपणे कर्तव्य बजावून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रभक्ती ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती आपल्या आचार-विचारांत आणि कृतीत दिसली पाहिजे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी भावना दर्शन पवार, श्लोक साईनाथ भुरके, भार्गवी राहुल कुलकर्णी, ईश्वरी संजय कोल्हे, दुर्वा पोपट खताळ, पूर्वी सोपान क्षीरसागर, शरयू प्रमोद सागर आणि अक्षरा अरविंद हासे यांनी क्रांती दिन, आदिवासी दिन व ग्रंथालय दिन यावर समायोचित भाषणे सादर केली.

# अगस्ती इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठ परीक्षेत घवघवीत यश

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अगस्ती इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन ॲण्ड रिसर्च, अकोले या संस्थेने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. विविध अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय गुण मिळवत संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. एमबीए विभागात देशमुख रमेश संपतराव याने ७२ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. खांबेकर प्रसन्ना संतोष हिने ७१.९० टक्के गुणांसह द्वितीय, तर देशमुख योगेश अप्पासाहेब याने ७१.१८ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

एमबीए प्रथम वर्षात देशमुख ऋतुजा राजेंद्र हिने ७१.३७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. पवार संदिप ताराचंद याने ६८.८८ टक्के गुणांसह द्वितीय, तर गोरे सायली बाळासाहेब हिने ६८.६८ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. एमबीए थेट द्वितीय वर्ष (लॅटरल एन्ट्री) मध्ये आभाळे ऋतुजा भाऊसाहेब हिने ७०.८१ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. कर्पे अभिषेक ज्ञानेश्वर याने ७०.७५ टक्के गुणांसह द्वितीय, तर पन्हाळकर अर्चना रामकिसनराव हिने ६७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला.

एमसीए विभागात गोर्डे अनुजा भिकाजी हिने ७७.९१ टक्के गुण मिळवत विभागात प्रथम क्रमांक पटकावला. वैद्य अनुजा भाऊसाहेब हिने ७१.०८ टक्के गुणांसह द्वितीय, तर आहेर प्रिया म्हाळू हिने ७०.६९ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. एमसीए प्रथम वर्षात आहेर माधुरी एकनाथ हिने ७६.८३ टक्के गुणांसह प्रथम, देशमुख पूनम अरुण हिने ७५.८३ टक्के गुणांसह द्वितीय, तर देशमुख प्राची भाऊसाहेब हिने ७५.६६ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. ही माहिती परीक्षा विभागप्रमुख प्रा. सुयोग गजे यांनी दिली. कार्यकारी कायमस्वरूपी विश्वस्त माजी आ. वैभवराव पिचड, कायमस्वरूपी विश्वस्त गिरजाजी जाधव, स्वीकृत विश्वस्त सुरेशराव कोते, मधुकर सोनवणे, डॉ. संपतराव वैद्य, अध्यक्ष सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत यांच्यासह सर्व विश्वस्त व कार्यकारिणी सदस्यांनी अभिनंदन केले. तसेच संस्थेचे संचालक डॉ. प्रशांत तांबे, एमबीए विभागप्रमुख डॉ. गोपाल बूब, एमसीए विभागप्रमुख प्रा. अमोल नवले, सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.


**महाराष्ट्र शासन**

सत्यमेव जयते

विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनिकरण विभाग, अहिल्यानगर

ddsfdanr@gmail.com

**ई-निविदा सुचना क्र. ४ सन २०२६ - २७**

विभागीय वनअधिकारी (सामाजिक वनिकरण) विभाग, अहमदनगर-४१४००१, दूरध्वनी क्रमांक-०२४१-२४२९६७० हे योग्य त्या नोंदणीकृत खुल्या वर्गातील संस्थेकडून खालील कामांकरीता https://Mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रणालीव्दारे मागवित आहेत.

स्विकृती दिनांक -१२/०८/२०२६ सकाळी ११.०० ते दिनांक १९/०८/२०२६ दुपारी ५.३० पर्यंत

| Sr. No. | Name of Work | Amount put to Tender Rs. | EMD | Class of Contractor/ Category | Tender Fee (Including GST) in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Open CCT WORKS (Number -5 Parner SFD Range) (at Vadner Haweli, Katalvedha-2, Palaspur, Punewadi, Sawargav -1) | 3109705/- | 31097/- | M.S.S | 2360/- |
| 2 | Vantale Works (Number -3) at Parner Range | १४८७१७२/- | १४८७२/- | Unemployed Engineer | 2360/- |

तरी सदरील कामांची ई निविदा ऑनलाईन प्रणालीद्वारे इच्छुक नोंदणीकृत कंत्राटदार / संस्थेने दिनांक १९/०८/२०२६ पर्यंत ऑनलाईन सादर करावेत. सविस्तर अटी व शर्ती ई निविदा अर्जासोबत उपलब्ध करून देण्यात येतील.

जिमाका / नगर / जाहि / ७८ /२०२६

विभागीय वनअधिकारी,
सामाजिक वनीकरण, अहिल्यानगर


पान १ वरून

## शहरात डासांचा प्रादुर्भाव...

नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. आरोग्य विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही त्याची अपेक्षित दखल घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. दरम्यान, डास प्रतिबंधक औषध फवारणीचे काम ज्या कंपनीला देण्यात आले होते, त्या ठेक्याची मुदत संपल्याचे समजते. ठेका संपला असला तरी पावसाळ्यात नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित ही अत्यावश्यक सेवा बंद पडणे योग्य नाही. ठेका संपण्यापूर्वीच नगरपालिका प्रशासनाने पर्यायी व्यवस्था उभी करणे गरजेचे होते, अशी नागरिकांची मागणी आहे. पावसाळ्यात डासांची संख्या वाढल्याने डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. तसेच दूषित पाणी आणि अस्वच्छतेमुळे टायफॉईडसह विविध साथीचे आजार पसरण्याची शक्यता असते. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना अशा आजारांचा धोका अधिक असल्याने पालिका प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

शहरातील अनेक नागरिक सर्दी, खोकला, ताप आणि इतर आजारांनी त्रस्त असून विविध रुग्णालयांत उपचार घेत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्यापूर्वीच नगरपालिका प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. शहरातील सर्व प्रभाग आणि उपनगरांमध्ये तातडीने डास प्रतिबंधक औषधाची फवारणी करावी, साचलेले पाणी व कचरा हटवावा, नियमित स्वच्छता मोहीम राबवावी तसेच रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्यापूर्वी नगरपालिका प्रशासनाने केवळ कागदोपत्री अथवा पवरील तक्रारींच्या नोंदीपुरती कारवाई न करता प्रत्यक्षात उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पावसाळ्यात डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी सातत्याने फवारणी आणि स्वच्छता करणे आवश्यक असताना ही यंत्रणा ठप्प असल्यास भविष्यात शहरात साथीचे आजार वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नगरपालिका प्रशासन आता तरी जागे होणार का, असा सवाल संगमनेरकरांकडून उपस्थित केला जात आहे.

## दूध-पनीरसह अन्न भेसळखोरांवर ...

तसेच अशा प्रकरणांसाठी तातडीने विशेष लीगल टीम तयार करावी, असेही त्यांनी सांगितले. भेसळ करणाऱ्यांचे जाळे संघटित पद्धतीने कार्यरत असल्यास त्यांच्यावर संघटित गुन्हेगारीच्या तरतुदींनुसार कारवाई करण्याच्या दृष्टीने आवश्यक प्रक्रिया मजबूत करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. त्यामुळे दूध, पनीर आणि अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांविरोधात येत्या काळात राज्यभर अधिक आक्रमक कारवाई होण्याची शक्यता आहे. बैठकीस आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, विधी व न्याय राज्यमंत्री आशिष जयस्वाल, गृह तसेच अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नवीन सोना, विधी व न्याय विभागाचे सचिव उदय शुक्ला, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.





**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME IS
BAGUL PRATIK BHAGWAN (BORD CERTIFICATE) (BE-FORE NAME)
TO NEW NAME
PRATIK BHAGVAN BAGUL
AADHAR NO:- 266602786756

**पाहिजेत**
डायलिसिस टेक्निशियन
प्रशिक्षित उमेदवार – २ पदे
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
– संपर्क –
8888882225
9766855593

**त्वरित भरती** आजच संधीचा लाभ घ्या
सर्व्हिस ॲडव्हायझर – 01 जागा
शैक्षणिक पात्रता :- ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल डिप्लोमा
अनुभव :- फ्रेशर किंवा कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये १ वर्षाचा अनुभव असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.
स्पेअर पार्ट्स बिलिंग – 01 जागा
कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये स्पेअर पार्ट्स बिलिंगचा किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक.
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.
पत्ता - घुलेवाडी ता. संगमनेर, जि. अ.नगर
मो. ९४२२७३५५६४







**पाहिजेत**
एक पुरुष कर्मचारी/मुलगा
पात्रता - लिहिता वाचता येणे आवश्यक
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल
नवीन नगर रोड संगमनेर
– संपर्क –
7972999316

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

**फॅकल्टी पाहिजे** अगस्ती अकॅडमी संगमनेर
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI – 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727

## दिनविशेष

२००४: — ग्रीसमधील अथेन्स येथे २८ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली. सुमारे ३०० दूरचित्रवाणी वाहिन्यांवरुन अंदाजे ४ अब्ज लोकांनी हा उदघाटन सोहळा पाहिला.

१९९१: — कन्नड साहित्यिक प्रा. विनायक कृष्ण गोकाक यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर.

१९६१: — आपल्या नागरिकांचे पश्चिम जर्मनीत होणारे स्थलांतर रोखण्यासाठी पूर्व जर्मनीने आपल्या सीमा बंद केल्या. बर्लिनची भिंत बांधण्यास सुरूवात झाली.

१९५४: — रेडिओ पाकिस्तान वरुन कौमी तराना हे पाकिस्तानचे राष्ट्रगीत प्रथमच प्रक्षेपित करण्यात आले.

१९१८: — बायरिसचे मोटेर्न वेर्के एजी (बी.एम.डब्ल्यू.) ही सार्वजनिक कंपनी म्हणून स्थापन झाली.

१८९८: — कार्ल गुस्ताव्ह विट याने Eros या पृथ्वीजवळच्या पहिल्या लघुग्रहाचा शोध लावला.

## जन्म

१९८३: संदीपन चंदा — भारताचे ९वे ग्रँडमास्टर

१९७५: शोएब अख्तर — पाकिस्तानी क्रिकेटपटू

१९७२: केविन प्लँक — अमेरिकन उद्योगपती, अंडर आर्मर कंपनीचे संस्थापक

१९६३: श्रीदेवी — भारतीय अभिनेत्री, प्रामुख्याने हिंदी चित्रपटात अभिनय — पद्मश्री (निधन: २४ फेब्रुवारी २०१८ )

१९५८: रँडी शुगर्ट — अमेरिकन सार्जंट, मेडल ऑफ ऑनर विजेते (निधन: ३ ऑक्टोबर १९९३ )

१९५६: रोहिंटन फली नरिमन — भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश

१९४७: मार्गारिटा विनबर्ग — स्वीडन देशाचे उपपंतप्रधान, स्वीडिश राजकारणी

१९४५: रॉबिन जॅकमन — भारतीय-इंग्लिश क्रिकेटर

१९४५: लार्स Engqvist — स्वीडन देशाचे उपपंतप्रधान, राजकारणी

१९३६: वैजयंतीमाला — चित्रपट अभिनेत्री

## मृत्यू

२०१६: स्वामी महाराज — भारतीय हिंदू नेतेप्रमुख (जन्म: ७ डिसेंबर १९२१ )

२०१६: प्रमुख स्वामी महाराज — भारतीय हिंदू नेते (जन्म: ७ डिसेंबर १९२१ )

२०१५: ओम प्रकाश मुंजाल — भारतीय उद्योगपती, हिरो सायकल्स कंपनीचे सह-संस्थापक (जन्म: २६ ऑगस्ट १९२८ )

२०११: तारेक मसूद — बांगलादेशी दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथा लेखक (जन्म: ६ डिसेंबर १९५६ )

२०११: मिशुक मुनीर — बांगलादेशी पत्रकार आणि सिनेमॅटोग्राफर (जन्म: २४ सप्टेंबर १९५९ )

२००५: डेव्हिड लँगे — न्यूझीलंड देशाचे ३२वे पंतप्रधान, वकील आणि राजकारणी (जन्म: ४ ऑगस्ट १९४२ )

२०००: नाझिया हसन — पाकिस्तानी पॉप गायिका (जन्म: ३ एप्रिल १९६५ )

१९९६: अँटोनियो डी स्पिनोला — पोर्तुगाल देशाचे १४वे राष्ट्राध्यक्ष, जनरल आणि राजकारणी (जन्म: ११ एप्रिल १९१० )

१९८८: गजानन जागीरदार — चित्रपट निर्माते, दिग्दर्शक वव अभिनेते

१९८५: जे. विलार्ड मेरिऑट — मेरिऑट कॉर्पोरेशनचे संस्थापक (जन्म: १७ सप्टेंबर १९०० )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१३ ऑगस्ट**

# बर्लिनची भिंत उभारली; जर्मनीच्या विभाजनाला मिळाले नवे रूप

दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीचे विभाजन झाले आणि त्याचे पश्चिम जर्मनी व पूर्व जर्मनी असे दोन भाग निर्माण झाले. पश्चिम जर्मनीमध्ये लोकशाही व्यवस्था होती, तर पूर्व जर्मनीवर सोव्हिएत संघाच्या प्रभावाखाली समाजवादी शासन होते. जर्मनीची राजधानी बर्लिनदेखील पूर्व आणि पश्चिम अशा दोन भागांत विभागली गेली होती. मात्र, बर्लिन शहर भौगोलिकदृष्ट्या पूर्व जर्मनीच्या हद्दीत असल्याने त्याचे विभाजन हे शीतयुद्धाचे अत्यंत महत्त्वाचे प्रतीक बनले.१९५०च्या दशकात पूर्व जर्मनीतील अनेक नागरिक आर्थिक संधी, चांगले जीवनमान आणि अधिक स्वातंत्र्याच्या अपेक्षेने पश्चिम जर्मनीकडे स्थलांतर करू लागले. बर्लिनमार्गे पश्चिमेकडे जाणे तुलनेने सोपे असल्याने मोठ्या प्रमाणावर नागरिक पूर्व बर्लिनमधून पश्चिम बर्लिनमध्ये जाऊ लागले. या स्थलांतरामुळे पूर्व जर्मनीसमोर मनुष्यबळाची आणि आर्थिक विकासाची गंभीर समस्या निर्माण झाली. कुशल कामगार, डॉक्टर, अभियंते, विद्यार्थी आणि तरुण मोठ्या संख्येने पश्चिमेकडे जात होते.ही परिस्थिती थांबवण्यासाठी पूर्व जर्मनीच्या सरकारने कठोर पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला. १३ ऑगस्ट १९६१ रोजी पूर्व जर्मनीने पश्चिम बर्लिनकडे जाणाऱ्या सीमा बंद करण्यास सुरुवात केली. रातोरात काटेरी तारांचे कुंपण उभारण्यात आले आणि त्यानंतर त्याच ठिकाणी मजबूत काँक्रीटची भिंत बांधली जाऊ लागली. पुढील काळात हीच रचना जगभरात ‘बर्लिनची भिंत’ म्हणून प्रसिद्ध झाली.भिंतीमुळे कुटुंबे, मित्र आणि नातेवाईक एका रात्रीत एकमेकांपासून वेगळे झाले. पूर्व बर्लिनमधील नागरिकांना पश्चिम बर्लिनमध्ये जाण्यावर कठोर निर्बंध घालण्यात आले. भिंतीभोवती सुरक्षा मनोरे, काटेरी तारांचे कुंपण, प्रकाशयोजना आणि सैनिकांची तैनाती करण्यात आली. पश्चिमेकडे पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या नागरिकांना अटक केली जात असे आणि काही जणांचा मृत्यूही झाला.बर्लिनची भिंत ही केवळ काँक्रीटची भिंत नव्हती; ती शीतयुद्धातील अमेरिका आणि सोव्हिएत संघाच्या वैचारिक संघर्षाचे प्रतीक बनली. एका बाजूला लोकशाही व भांडवलशाही व्यवस्था, तर दुसऱ्या बाजूला समाजवादी व्यवस्था अशी जगाची विभागणी या भिंतीतून स्पष्टपणे दिसत होती.१९६१ मध्ये सुरू झालेल्या या भिंतीने जवळपास २८ वर्षे बर्लिनचे विभाजन कायम ठेवले. अखेर ९ नोव्हेंबर १९८९ रोजी बर्लिनची भिंत खुली करण्यात आली आणि तिच्या पतनाने शीतयुद्धाच्या समाप्तीचा मार्ग मोकळा झाला. पुढे १९९० मध्ये जर्मनीचे पुनर्एकीकरण झाले.

# वैजयंतीमाला - भारतीय चित्रपटसृष्टीतील अजरामर अभिनेत्री

**जन्मदिन विशेष**

वैजयंतीमाला या भारतीय चित्रपटसृष्टीतील अत्यंत लोकप्रिय आणि प्रतिभावान अभिनेत्री, नृत्यांगना आणि राजकारणी म्हणून ओळखल्या जातात. भारतीय चित्रपटांच्या सुवर्णकाळात आपल्या अभिनयाने, नृत्यकौशल्याने आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाने त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीवर ठसा उमटवला. त्यांचा जन्म १३ ऑगस्ट १९३६ रोजी मद्रास येथे झाला.लहानपणापासूनच वैजयंतीमाला यांना नृत्याची विशेष आवड होती. त्यांनी भरतनाट्यमचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. त्यांच्या नृत्यकौशल्यामुळे त्यांना लहान वयातच चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. ‘वाझकई’ (१९४९) या तमिळ चित्रपटातून त्यांनी बालकलाकार म्हणून चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर तमिळ आणि हिंदी चित्रपटांमध्ये त्यांनी



आपल्या अभिनयाची छाप पाडली.हिंदी चित्रपटसृष्टीतील त्यांची कारकीर्द विशेष उल्लेखनीय ठरली. ‘बहार’ (१९५१) या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. त्यानंतर ‘नागिन’, ‘देवदास’, ‘नया दौर’, ‘आशा’, ‘गंगा जमुना’, ‘संगम’ आणि ‘ज्वेल थीफ’ यांसारख्या अनेक गाजलेल्या चित्रपटांमधून त्यांनी विविध भूमिका साकारल्या.विशेषतः ‘देवदास’ (१९५५) मधील चंद्रमुखीची भूमिका त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा मानली जाते. या भूमिकेसाठी त्यांना व्यापक प्रशंसा मिळाली. अभिनयासोबतच त्यांच्या नृत्याचीही मोठी लोकप्रियता होती. शास्त्रीय नृत्य आणि चित्रपटातील नृत्य यांचा प्रभावी संगम त्यांनी प्रेक्षकांसमोर आणला. त्यामुळे त्या अभिनेत्रीबरोबरच एक उत्कृष्ट नृत्यांगना म्हणूनही प्रसिद्ध झाल्या.वैजयंतीमाला यांनी त्या काळातील अनेक आघाडीच्या कलाकारांसोबत काम केले. दिलीप कुमार, राज कपूर आणि देव आनंद यांच्यासोबतच्या त्यांच्या जोडीला प्रेक्षकांनी मोठी पसंती दिली. ‘नया दौर’ आणि ‘गंगा जमुना’ यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका आजही भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात महत्त्वाच्या मानल्या जातात.त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळाले. त्या फिल्मफेअर पुरस्कार विजेत्या अभिनेत्री असून, भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल त्यांना पद्मश्री सन्मानाने गौरविण्यात आले. पुढे त्यांनी सार्वजनिक जीवनातही प्रवेश केला आणि राज्यसभेच्या सदस्य म्हणून काम केले.वैजयंतीमाला यांचे व्यक्तिमत्त्व केवळ अभिनेत्री म्हणून मर्यादित राहिले नाही. अभिनय, नृत्य आणि सार्वजनिक जीवन या तिन्ही क्षेत्रांत त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. भारतीय चित्रपटसृष्टीती सुवर्णकाळाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रमुख अभिनेत्रींपैकी वैजयंतीमाला यांचे नाव आजही आदराने घेतले जाते.

# भंडारदऱ्यासाठी १५ व १६ ऑगस्ट रोजी एकेरी वाहतूक



छाया – विलास तुपे, राजूर

युवावार्ता (राजूर प्रतिनिधी)

या वर्षी १५ ऑगस्ट शनिवारी येत असून स्वातंत्र्य दिनी सलग सुट्टी जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे अनेकांनी पर्यटकांची पंढरी असलेल्या भंडारदरा धरण परिसरात भटकंती करण्यासाठी अनेक पर्यटक येत असल्यामुळे वाहतूकीत बदल करण्यात आला आहे.

१५ ऑगस्टच्या सुट्टीत पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी भंडारदरा धरण, रंधा धबधबा, कोकणकडा, हरिश्चंद्र गड, कळसुबाई शिखर, अमृतेश्वर मंदीर रतनवाडी, या प्रेक्षणीय स्थळी पुणे, नाशिक, ठाणे मुंबई आणि नगर जिल्हयातुन मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. १५ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट दरम्यान उपरोक्त प्रेक्षणीय स्थळी पर्यटकांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे. त्याचप्रमाणे सध्या पावसामुळे रस्ते मोठ्या प्रमाणात खराब झालेले आहेत. सदर भागातील रस्ते अरुंद असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होवुन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या करीता वाहतुक नियमात बदल करण्यात आले आहेत.

जिल्हयाचे पोलीस अधीक्षक मुमाका सुदर्शन यांनी तसे आदेश दिले आहेत. यानुसार रंधा फाटा येथून भंडारदरा येथे जाण्यासाठी प्रवेश बंद करण्यात आला आहे. शेंडी / भंडारदरा येथे जाण्यासाठी वाकी फाटा, वारंघुशी फाटा येथुन प्रवेश असेल. एकेरी वाहतुकीचा मार्ग वारंघुशी फाटा वाकी फाटा - चिचोंडी फाटा, यश रिसोर्ट, शेंडी, भंडारदरा धरण, स्पिल्वे गेट भंडारदरा, गाव- गुहीरे रंधा मार्गे इच्छित स्थळी जाता येणार आहे. यातून फक्त अत्यावश्यक सेवा ॲम्बुलन्स, अग्निशामकदल, शासकीय वाहने यांना वगळण्यात आले आहे. पर्यटकांची गर्दी बघता नियमावलीचे पालन करणे बंधनकारक असुन वाहने देखील चेक होणार आहे. मद्यपान करणे किंवा मद्य बाळगू नये असे आवाहन राजूर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरिक्षक किशोर पवार यांनी केले आहे.

# तरूणाच्या खूनास दारू उत्पादन शुल्क जबाबदार- हेरंब कुलकर्णी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यात गावोगावी अनेक वर्षे अवैध दारू पोहोचवणाऱ्या सचिन जाधवला पिंपळ-गाव निपाणी येथील तरुणाच्या खुनाबद्दल अटक झाली. या जाधवबद्दल गेले पाच वर्ष आम्ही सातत्याने तक्रार करत होतो. पण पोलीस व उत्पादन शुल्क विभाग यांनी त्याला तडीपार केले नाही व त्यातून आज खुनाची घटेता घडली यावरुन दारू विक्रेत्यांना अशाप्रकारे हफ्ते घेऊन पाठिशी घालणारे पोलीस व उत्पादन शुल्क विभाग हेही या गुन्ह्यात तितकेच जबाबदार आहेत. त्यांच्या भ्रष्टाचारामुळे आज ही वेळ आल्याने या खुनाची जबाबदारी हे दोन्ही विभाग

घेतील का? असा प्रश्न अकोले तालुका दारूबंदी



आंदोलन समितीच्यावतीने हेरंब कुलकर्णी यांनी उपस्थित केला.

याबाबत बोलताना कुलकर्णी म्हणा-ले, आजपर्यंत अवैध दारूबद्दल जितके निवेदने दिले त्या प्रत्येक निवेदनात सचिन जाधव तालुक्याच्या गावागावात दारू पोहोचवत आहे, इतकेच काय तर तो आणि त्याचा साथीदार नवले यांचे गाडी क्रमांक व कुठून दारू आणतात हे तपशील सातत्याने आम्ही पोलीस विभागाला दिले. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांना कोणत्या दुकानातून दारू येते हे तपशील दिले. परंतु, त्या गाड्या पकडल्या गेल्या नाहीत किंवा कारवाई झाली नाही. यातून मस्तवाल झालेल्या दारू विक्रेत्यांनी खुनाचा गुन्हा केला त्याला जबाबदार पोलीस व उत्पादन शुल्क विभाग आहे असा आरोप त्यांनी केला. अजूनही वेळ गेलेली नाही. जाधव याचा धंद्यातील साथीदार नवले आणि वाकचौरे रोज मध्यरात्री गावागावात अवैध दारू पोहोचवत आहेत. त्यांना अटक करून तडीपार करावे अशी मागणी केली आहे. अन्यथा आंदोलन करण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नाही असा इशारा हेरंब कुलकर्णी यांनी प्रशासनाला दिला आहे.

# बालसंगोपन' योजनेची चौकशी अकोलेतच करण्याची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - एकल महिलांच्या मुलांसाठी राबविण्यात येणाऱ्या ’बालसंगोपन योजना’ अंतर्गत लाभार्थी महिला व मुलांची चौकशी व पडताळणी अकोले येथेच करण्यात यावी, अशी मागणी अहिल्या एकल हक्क संरक्षण समितीने आमदार डॉ. किरण लहामटे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या या चौकशीसाठी अकोलेपासून सुमारे १३० किलोमीटर दूर अहिल्यानगरला जावे लागत असून, तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागातील महिलांना १७५ किलोमीटरपर्यंत प्रवास करावा लागतो. प्रवास खर्च, मजुरीचे नुकसान आणि लहान मुलांना सोबत नेण्याची अडचण यामुळे महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे समितीने म्हटले आहे. अकोलेतच पडताळणीची सुविधा उपलब्ध केल्यास महिलांचा वेळ व पैसा वाचून योजनेचा लाभ घेणे सुलभहोईल, असे समितीने निवेदनात नमूद केले आहे. या प्रश्नाबाबत महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांची भेट घेणार असल्याचे आमदार लहामटे यांनी सांगितले. प्रशासनाने या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी ज्योत्स्ना देशमुख, सिंधू धोंगडे, नीता डावरे, छाया चौधरी, छाया पोटे, सुनीता पडवळ, पूजा गोसावी, सुवर्णा गडगे, ज्योती वाकचौरे, शीतल गावंडे, वैशाली वाळुंज, यास्मिन शेख, नीलिमा चव्हाण, लींजयाना शेख यांच्यासह समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे

# मराठी न येणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांवर कारवाई; परवाना रद्द करण्याची तरतूद

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात रिक्षा आणि टॅक्सी चालविणाऱ्या चालकांना आता मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान असणे बंधनकारक करण्यात येणार आहे. मराठी बोलता येत नसलेल्या चालकांवर कारवाई करण्यासाठी मोटार वाहन कायद्यात आवश्यक बदल करण्याचा प्रस्ताव मंजूर झाला असून, यासंदर्भातील शासन निर्णय आज जाहीर होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

प्रस्तावित नव्या नियमांनुसार रिक्षा किंवा टॅक्सी चालकाला मराठी भाषेचे जुजबी अथवा व्यवहारिक ज्ञान नसल्याचे आढळल्यास त्याला प्रथम एक महिन्याची मुदत देण्यात येणार आहे. या कालावधीत चालकाने मराठी भाषा शिकून व्यवहार करता येईल, अशी अपेक्षा असेल. मात्र, मुदत संपल्यानंतरही मराठीचे ज्ञान आत्मसात केले नाही, तर संबंधित चालकाचा वाहन चालविण्याचा परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित केला जाऊ शकतो.

त्यानंतरही चालकाने मराठी शिकण्यास टाळाटाळ केल्यास त्याचा परवाना कायमस्वरूपी रद्द



करण्याची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात रिक्षा-टॅक्सी सेवा देणाऱ्या चालकांसाठी मराठीचे ज्ञान हा महत्त्वाचा निकष ठरणार आहे. परिवहन विभागाने यासंदर्भातील कायद्यातील बदलाचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर केला होता. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर आता शासन निर्णय जारी करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सुरू केलेल्या मराठी भाषेच्या आग्रहाला आता कायदेशीर आधार मिळणार असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, मराठी भाषेचा अवमान किंवा मग्रुरी खपवून घेतली जाणार नाही; मग्रुरी मोडून काढणार, अशी आक्रमक भूमिका सरनाईक यांनी घेतली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रात सार्वजनिक प्रवासी वाहतूक करणाऱ्या चालकांना स्थानिक प्रवाशांशी मराठीत संवाद साधणे अधिक सुलभ होणार असून, मराठी भाषेला सार्वजनिक व्यवहारात अधिक बळ मिळण्याची शक्यता आहे.

# 'ज्ञानोबा माऊली तुकाराम ' च्या जयघोषात निघाली वारकऱ्यांची दिंडी



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

श्रीक्षेत्र बाळेश्वर दिंडी संचलित संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पायी दिंडी सोहळ्याच्या पंढरपूरहून वीणापरतीच्या ‘(पळशी सोड)’ कार्यक्रमानिमित्त संगमनेरमध्ये भक्तिमय वातावरण निर्माण झाले. आमदार अमोल खताळ यांच्या निवासस्थानापासून शेकडो वारकऱ्यांच्या उपस्थितीत ‘ज्ञानोबा माऊली तुकाराम’, ‘विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठलचा जयघोष करत टाळ-मृदंगाचा गजर, अभंग-गजर आणि विठ्ठल नामस्मरण करत वारकरी दिंडीत सहभागी झाले. आमदार अमोल खताळ यांच्या निवासस्थानापासून निघालेली ही दिंडी साई श्रद्धा चौक नाशिक रोड, गणेशनगर मार्गे मातोश्री लॉन्स येथे पोहोचली. मार्गावरही नागरिकांनी दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत केले.मातोश्री लॉन्स येथे दिंडीचे भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. यानंतर श्रीक्षेत्र बाळेश्वर पायी दिंडीचे प्रमुख विश्वनाथ महाराज नवले यांचे हरिकीर्तन झाले.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# लायन्स सफ्रॉनच्या वतीने १४ ऑगस्टला स्वातंत्र्योत्सव 'जोश - द डान्स शो' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन




## देशभरात नावजलेला रायगडचा जय हनुमान कला मंच डान्स ग्रुप प्रमुख आकर्षण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरच्या वतीने गेल्या २३ वर्षांपासून सातत्याने स्वातंत्र्योत्सव उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या २३व्या वर्षानिमित्त 'आझादी का उत्सव, गर्व का पर्व' या संकल्पनेखाली 'जोश - द डान्स शो' या भव्य सामूहिक नृत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, १४ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता मालपाणी लॉन्स, लक्ष्मी रोड, संगमनेर येथे हा कार्यक्रम होणार असल्याचे संस्थापक अध्यक्ष गिरीश मालपाणी, माजी अध्यक्ष श्रीनिवास भंडारी यांनी सांगितले आहे.

लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरचे संस्थापक अध्यक्ष गिरीश मालपाणी यांनी सांगितले की, स्वातंत्र्योत्सवाच्या माध्यमातून गेल्या २३ वर्षांपासून संगमनेरकरांना विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक कार्यक्रमांची मेजवानी देण्यात येत आहे. या उपक्रमात आचार्य गोविंददेवगिरीजी महाराज, मनींदरजितसिंग बिट्टा, आफळे महाराज, राहुल सोलापूरकर, सुनिल देवधर, डॉ. संजय मालपाणी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर वक्त्यांनी उपस्थित राहून आपले विचार मांडले आहेत. त्यामुळे स्वातंत्र्योत्सव हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम न राहता संगमनेरच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वाचा भाग बनला आहे.

यंदाच्या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे 'जोश - द डान्स शो'मधील सामूहिक नृत्य सादरीकरण. विविध शाळा आणि नृत्यसंस्थांमधील विद्यार्थी देशभक्ती, भारतीय संस्कृती आणि राष्ट्रप्रेमाची भावना नृत्याच्या माध्यमातून सादर करणार आहेत. गणेश वंदना, पोतराज, बाजी प्रभु देशपांडे, क्रिष्णा फ्युजन डान्स, शिवराज्याभिषेक थीम असे यावेळचे प्रमुख नृत्य आकर्षण असणार आहेत. देशभर गाजलेला रायगडचा जय हनुमान कला मंच डान्स ग्रुप, मुद्रा डान्स अकॅडमी, कृष्णा गोविंद डान्स अकॅडमी, ध्रुव ग्लोबल स्कूल, अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूल, अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूल, पोदार इंटरनॅशनल स्कूल, स्ट्रॉबेरी स्कूल, जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल तसेच एक्स स्ट्रेंजर ग्रुप, लोणी सहभागी होणार आहेत.

कार्यक्रमाचा प्रवेश विनामूल्य असून, संगमनेरकरांनी आपल्या कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराला दाद द्यावी आणि स्वातंत्र्योत्सवाचा हा अनोखा सोहळा अनुभवावा, असे आवाहन लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉनच्या वतीने करण्यात आले आहे.

या उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख सुदीप हासे, डॉ. जितेंद्र पाटील व प्रशांत गुंजाळ, तर सहप्रकल्प प्रमुख गिरीश मालपाणी व श्रीनिवास भंडारी आहेत. प्रकल्प समितीत कुलदीप कागडे, अतुल अभंग, कल्याण कासट, धनंजय धुमाळ, अमोल भरीतकर, संतोष अभंग, कल्पेश मर्दा, किशोर कातोरे, अक्षय गोरले, सुनिता मालपाणी, स्वाती लोढा, अंजली पाटील, सुचित्रा कातोरे, अनन्या धुमाळ, मिनल अभंग, संगिता पुंड, सोनल गोरले, व्यंकटेश अमृतवाड, नितीन नवले, हर्षल सोनवणे, निलम जोर्वेकर, सचिन गाडे, विनायक भोईर यांचा समावेश आहे.

# राजापूर बंधाऱ्यातून पाणी गळती



संगमनेर तालुक्यातील राजापूर येथील म्हाळुंगी नदीवरील बंधाऱ्यातून निकृष्ठ ढाप्यांमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत आहे. त्यामुळे डागडुजीसाठी धरण खाली करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवणार असे दिसते. या प्रश्नाकडे जलसंधारण विभागाचा कानाडोळा असून याची तात्काळ दखल घेण्याची मागणी राजापूर ग्रामस्थांनी केली आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
❋ कर्ज रक्कम वाढ । ❋ कर्ज व्याजदर कमी । ❋ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# इम्पेरियलमध्ये वाईन्स स्थलांतरास तीव्र विरोध कायम

## परवानगी दिल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील सी. एम. तळरेजा वाईन्स हे संगमनेर येथील नाशिक-पुणे न महामार्गावरील टॉप टेन इम्पेरियल, यशोधन कॉम्प्लेक्स येथे स्थलांतरित करण्याच्या प्रस्तावाला टॉप टेन इम्पेरियलमधील व्यापारी तसेच न परिसरातील नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या स्थलांतरास परवानगी देऊ नये, अशी मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी लक्ष्मण ढेरंगे, रखी शिंदे, सुदर्शन पठाडे, पारसमल संकलेचा, भारत मेहता, हर्षवर्धन खुळे, दीपक भालेराव आदीसह व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगर येथील सीएम तलरेजा वाईन्स स्थलांतरित करून संगमनेर येथील टॉप टेन इम्पेरियल, यशोधन कॉम्प्लेक्स येथे सुरू करण्यासाठी

अनुज्ञप्तीधारकाने अर्ज केलेला आहे. मात्र, प्रस्तावित जागा ही व्यावसायिक कॉम्प्लेक्समध्ये असून येथे विविध दुकाने व कार्यालये कार्यरत आहेत. या ठिकाणी

दैनंदिन खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. विशेषतः महिला व लहान मुलांची संख्या लक्षणीय असून कॉम्प्लेक्समध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्येही महिलांचा मोठा सहभाग आहे. अशा ठिकाणी वाईन शॉप सुरू झाल्यास महिलांच्या सुरक्षिततेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असून खरेदीसाठी येणाऱ्या महिला तसेच काम करणाऱ्या महिलांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होऊ शकते, अशी भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. या ठिकाणी विविध दुकाने व कार्यालये सुरूअसल्याने वाईन शॉप सुरू झाल्यास इतर व्यावसायिकांना

दैनंदिन कामकाजात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्याचा थेट परिणाम त्यांच्या व्यवसायावर होऊन आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात म्हटले आहे. आक्रमक ग्रामस्थांनी या इम्पेरियलमध्ये वाईन्स स्थलांतरला विरोध दर्शविला आहे.

# काँग्रेसला अच्छे दिन येतील, पोल ट्रॅक्टर सर्व्हेचा अंदाज

## निवडणुका झाल्यास भाजपला मोठा फटाका

मुंबई (वृत्तसंस्थआ)

देशात आताच्या घडीला लोकसभेची निवडणूक झाल्यास भाजपप्रणित एनडीएला मोठा फटका बसण्याची शक्यता 'पोल ट्रॅकर' या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून दिसून आली आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या सर्वेक्षणाचे निकाल सांगणारा एक व्हिडीओ ट्विट करत भाजपला डिवचले आहे. आता खऱ्या अर्थाने 'अच्छे दिन' येणार, जुने चांगले दिवस परत येणार, मोदी-शाह जाणार, ते नक्की जाणार, असे ट्विट संजय राऊत यांनी केले आहे. या ट्विटसोबत संजय राऊत यांनी 'पोल ट्रॅकर'च्या सर्वेक्षणाचे विश्लेषण करणारा एक व्हिडीओ शेअर केला आहे.पोल ट्रॅकरने 'मूड ऑफ इंडिया' या नावाने सर्वेक्षण केले होते. या सर्व्हेची सॅम्पल साईझ ४ लाख ५३ हजार इतकी आहे. या सर्वेक्षणानुसार सध्याच्या घडीला लोकसभा निवडणूक झाल्यास भाजपप्रणित एनडीए आघाडीला राम मंदिरातील घोटाळा आणि जंतर मंतरवरील विद्यार्थी आंदोलनाचा मोठा फटका बसेल. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्त्वामुळे आतापर्यंत सलग १२ वर्षे सत्तेत असूनही भाजपला अँटी इन्कम्बन्सी फॅक्टरचा फटका बसलेला नव्हता. मात्र, राम मंदिर आणि जंतर मंतरवरील आंदोलनामुळे मोदींचा करिष्मा फिका पडू शकतो.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
• पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
• हेल्थ इंडिया इन्शुरन्स
• FHPL हेल्थ इन्शुरन्स
• इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
• बजाज आलियांज इन्शुरन्स
• एसबीआय जनरल इन्शुरन्स
• ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
• मेडसेव टीपीए प्रा.लि.
• जेनिन्स इंडिया टीपीए लि.
• ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
• टाटा एआयजी इन्शुरन्स
• रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
• नॅशनल इन्शुरन्स कं.
• न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
• निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
• स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
• दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
• एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
• युनायटेड हेल्थकेअर लि.
• Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
• मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
• एम.डी.इंडिया हेल्थकेअर
• विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
• पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटिव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165




अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी
अंगावरून पांढरे जाणे
गर्भ न रहाणे
वारंवार गर्भपात होणे
गर्भाशयात गाठी
गर्भाशयाचा कर्करोग
♦ स्तनांची वाढ न होणे
♦ स्तनातून दूध न येणे
♦ स्तनात गाठी
♦ स्तनाचा कर्करोग
♦ योनी मार्गाची दुर्गंधी
♦ गुप्त अंगाला खाज
♦ विविध त्वचा विकार
♦ गुप्तरोग, गर्मी
♦ लघवीला जळजळ
♦ संभोगात रस न येणे
♦ संभोगा विषयीची भीती
♦ हस्तमैथूनाची सवय
♦ लैंगिक विकृती
♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय रोग परिहाराय
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25